'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue 47 : मराठा समाज : साहित्य, संस्कृती, इतिहास आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117

ISSN : 2348-7143
February 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 49 | मराठा समाज आणि महाराष्ट्रातील राजकारण | - डॉ. सोनाली पाटील | 199 |
| 50 | कर्तृत्ववान मराठा स्त्रियांची ऐतिहासिक कामगिरी : सेनापती उमाबाई दाभाडे | - प्रा. उषा गायकर | 204 |
| 51 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मराठा समाजाचे सामाजिक व राजकीय चित्रण | -प्रा. एच. टी. वाघमारे | 208 |
| 52 | मराठा मोर्चा : एक विश्लेषण | - डॉ. गणेश मोहिते | 213 |
| 53 | कर्तृत्ववान मराठा स्त्रियांची ऐतिहासिक कामगिरी | - प्रा. अशोक डिंबर | 217 |
| 54 | लोककल्याणकारी मराठा राजा : छत्रपती शिवराय | - प्रा. नारायण शिंदे | 222 |
| 55 | सत्यशोधक समाजाच्या कार्यात मराठा समाजाचे योगदान | - डॉ. रामदास भोंग | 228 |
| 56 | कर्मवीर काकासाहेब वाघ : एक प्रखर व्यक्तिमत्व | - प्रा. दर्शना पाटील | 232 |
| 57 | आरक्षण, मराठा मोर्चा आणि वास्तव | -प्राचार्य डॉ. पी. डी.देवरे | 236 |
| 58 | 'हिंदू' कादंबरीतील मराठा समाजाचे चित्रण | -डॉ. भास्कर ढोके | 240 |
| 59 | मराठा समाजाचे आजचे वास्तव | - डॉ. भाऊसाहेब गमे | 246 |
| 60 | 'पांगिरा' कादंबरीतील मराठा समाज चित्रण | - डॉ. दिलीप पवार | 250 |
| 61 | नाशिक जिल्ह्यातील मराठा कविंच्या काव्यातील समाज चित्रण | - डॉ. सुरेश जाधव | 256 |
| 62 | नागोवा मराठ्यांच्या प्राचीन इतिहासाचा | - रमेश पडवळ | 263 |
| 63 | अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अधिवेशनातील अध्यक्ष आणि स्वागताध्यक्ष यांचा शैक्षणिक दृष्टीकोन | प्रा. नामदेव गावित | 267 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**



Published by -
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 47 : मराठा समाज : साहित्य, संस्कृती, इतिहास आणि राजकारण
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
February 2018

# मराठा मोर्चा : एक विश्लेषण

डॉ. गणेश मोहिते
सहायक प्राध्यापक
पदवी व पदव्युत्तर मराठी भाषा विभाग व संशोधन केंद्र
बलभीम महाविद्यालय,बीड-४३११२२

महाराष्ट्राच्या इतिहासात २०१६ हे 'मोर्चांचे वर्ष' म्हणून गणले जाईल.मराठा क्रांती मूक मोर्चा, ओबीसीं, मुस्लिम, बहूजन, दलित वैगरे महाराष्ट्रदेशी असे असंख्य मोर्चे/ प्रती मोर्चे धडकले,त्यातून सामाजिक वातावरण ढवळून निघाले,काहींना तर ही क्रांती किंवा व्यवस्था परिवर्तनाची लढाई वाटू लागली होती.पण कालांतराने या मोर्चांनी उडवलेला 'धुरळा' खाली बसला, व्यवस्था परिवर्तनाची नांदी हवेतच विरली.अन् मागे उरला तो फक्त सामाजिक विद्वेष.तो इतका की प्रत्येकाला आपला जातीत 'पुर्नजन्म' झाला आहे असे वाटावे इतपत..! अगदी प्रत्येक जनं आपला जातीचा 'खुटा'पाचर लावून घट्ट करण्यात व्यस्त व्हावा असे काही तरी वातावरण तयार व्हावे,हे जसे दुर्दैव तसे हे वातावरण तयार करणार्यांचे चेहरे व मेंदू उघडे पडू नये हे आणखी मोठे दुर्दैवच.

महाराष्ट्रात या अगोदर कधी जातीचे मोर्चे निघाले नव्हतेच असे नाही.असंख्य जातीचे मोर्चे त्यांच्या न्याय हक्कांसाठी निघाले,त्यांनी संघर्ष केला,त्यांचे मागणे सरकारने मान्य केले,नाकारले वैगरे हे घडतच असते.मात्र इतर जातींनी कधी त्याचा विरोध अथवा मोर्चांना प्रती मोर्चांची भूमिका घेतली असेल तर ती अपवादानेच. परंतु जेंव्हा महाराष्ट्रात बहुसंख्य असणारा मराठा 'जात' म्हणून कोपर्डीतील अन्याय अत्याचाराच्या घटनेनंतर पहिल्यांदा लाखोच्या संख्येने रस्त्यांवर आला तेंव्हा ते चित्र काहींना अस्वस्थ करुन गेले.तर अनेक जात समुहांनी त्याचे समर्थन केले.त्यासह दुर्दैवी घटनेची निंदा केली. एका कोवळया वयातील शाळकरी मुलींवरील पाशवी अन्याय, अत्याचार पाहून सबंध समाजमन भेदरले.महाराष्ट्रात यापूर्वीही अशा अमानवीय घटना घडल्या तेंव्हा सर्वच स्तरातून त्यांचा निषेधच झाला होता.त्याच्या अनेक प्रतिक्रिया ही उमटल्या होत्या आणि त्या स्वाभाविक असतात.या घटनेचाही सर्वस्तरातून निषेध नोंदवला गेला. मात्र प्रशासकीय पातळीवर दिरंगाई झाली, सरकार असंवेदनशील असल्यासारखे वागले आणि त्याची प्रतिक्रिया म्हणून लोक रस्त्यांवर आले. पुढे औरंगाबादेत उत्सफुर्तपणे लाखोंचा मोर्चा निघाला. हे तसे तात्कालिक कारण होते.

या नव्या काळात जवळपास नव्वदीनंतर मुख्यत:शेतीवर असणारा हा समाज अस्वस्थच होता त्यांच्या अस्वस्थेचे असंख्य कारणे असली तरी शेतीचे प्रश्न अधिक महत्वाचे आहेत. यासह बाकी अनेक कारणांची चर्चा स्वतंत्रपणे करता येईल. हे सर्व प्रश्न घेवून पुढे जेंव्हा राज्यातील सर्वच जिल्ह्यातून हे मोर्चे काढले जातील असे चित्र निर्माण झाले तेंव्हा मात्र सरकारला हे विरोधीपक्षाचे कटकारस्थान वाटू लागले. मग तातडीने सरकार विरोधी हा रोष कमी करण्यासाठी 'झारीतील शुक्राचार्य' कामाला लागले. विशेषतः दृकश्राव्य माध्यमांतील स्वयंघोषीत विद्वतजन? या मोर्चांच्या हेतू बद्दल शंका घेवू लागले. नि:पक्षतेचे ढोल वाजविणारे मोठ मोठे

तथाकथित माध्यमातील विश्लेषक कावीळ भरल्या नजरेने पाहू लागले. मोर्चातील मूळ मागण्यांवर चर्चा घडवून आणण्याऐवजी जाती- जातीत तेढ कशी निर्माण होईल यास खतपाणी घालणारी चर्चा घडवण्यात माध्यमांतील काहींना धन्यता वाटली. मा.देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री झाले आणि ते ब्राम्हण आहेत हे मराठ्यांना सहन होत नाही म्हणून राष्ट्रवादी प्रायोजित हे मोर्चे आहेत अशीही कोल्हेकुई रात्र अन् दिवस चालवली. त्यातच मा.शरद पवारांना औरंगाबादेत मराठा मोर्चात अँट्रॉसिटी रद्द करण्याची मागणी होते आहे याबद्दल तुमचे मत काय असे पत्रकारांनी विचारले त्यावर ते असे म्हणाले की "अँट्रॉसिटी रद्द करण्याचे समर्थन मी करणार नाही. परंतु एवढा मोठा समुदाय रस्त्यांवर येवून मागणी करीत असेल व त्या कायद्याचा काही प्रमाणात गैरवापर होत असेल तर तो गैरवापर थांबला पाहिजे त्यासाठीची आवश्यक दुरुस्ती झाली पाहिजे." (या पत्रकार परिषेदेला मी उपस्थित होतो) संध्याकाळी एका चॅनलने त्यांच्या याच विधानाचा विपर्यास करीत पवारांनी अँट्रॉसिटी कायदा रद्द झाला पाहिजे म्हटले असे दाखवले. त्याचा कच्याकुट सुरु झाला. पुढे त्यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेवून तो खुलासा केला. परंतु दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे व बुद्धिभेद करण्याचे मनसुभे प्रथमतः इथे उघड झाले.

दलित समाज हा अनेक वर्ष अन्याय, अत्याचार आणि अमानुषतेचा बळी ठरलेला समुह आहे. अँट्रॉसिटी कायदा हा कोणत्याही माणसाला जातीय भावनेतून अमानवीय वागणूक मिळू नये यासाठी महत्वाचा व आवश्यक आहे.आणि दलित समाज या मुद्यावर संवेदनशील व आक्रमक आहे.याचाच फायदा घेत विशिष्ट पक्षाने राजकीय डावपेचाच भाग म्हणून काही सत्ताकांक्षी माणसांना हाताशी धरुन प्रतिमोर्चाची घोषणा करायला लावली. खरं तर औरंगाबादच्या मोर्चानंतर मराठा मोर्च्याच्या संयोजकांनी अँट्रॉसिटी कायदा रद्द करावा ही मागणी दुरुस्त केली होती. मा. प्रकाश आंबेडकरांनी महाराष्ट्र कोणत्या दिशेने चालला आहे. या विषयीचे सुचक विधान केले. याच पद्धतीचे वातारण तयार झाले तर सामाजिक विद्वेषापलिकडे आपल्या हाती काही लागणार नाही; हे त्यांनी लगेच जाणले होते.त्याच बरोबर त्यांनी या मोर्चांच्या माध्यमातून विशिष्ट शक्ती समाजात फुटीचे षडयंत्र रचत असल्याचे ही निर्देशीत केले होते, परंतु सत्तेच्या लामधारकांना हे घडविणे क्रमप्राप्त होते त्यातून विशिष्ट संघटनेच्या पुढाकाराने प्रत्येक जिल्ह्यात दलित बांधवांचेही प्रती मोर्चे निघाले.

दुसरा एक राजकीय डावपेच याच मोर्चाच्या अनुषंगाने आखला गेला. तो असा की मराठा मोर्चात आणखी एक मागणी तीव्र होती ती म्हणजे मराठा आरक्षणाची मराठ्यांचा ओबीसीत समावेश केल्याखेरीज आरक्षण देणे शक्य नाही.आणि हे सरकार मराठ्यांना त्याच पद्धतीने आरक्षण देण्याच्या विचारात आहे अशी ही चर्चा घडवून आणली. त्यातून ओबीसी समुहात अस्वस्थता पसरवली.आणि सत्तेतल्याच एका मंत्र्याच्या देखरेखी खाली पहिल्या ओबीसी मोर्चाचे नियोजन झाल्याचे समोर आले.नंतर राज्यात या पद्धतीने प्रतीमोर्चे काढण्याची स्पर्धा लागली. 'मराठा वगळून बहुजन' अशी ही मांडणी नव्याने सुरु झाली. यातुन सामाजिक वातावरण 'कुलपित' झाले. मोर्चातील मुख्य मागण्या बाजूला पडून कोणत्या मोर्चात किती संख्या जमली यावर चर्चा झडू लागल्या. समाजमाध्यमांत ऐकमेकांविरुद्ध 'गरळ' ओकली जावू लागली. विशिष्ट पक्षाच्या 'वार रुम' मधून सामाजिक विद्वेष पसरविणारे संदेश तयार करुन बेमालुमपणे समाजमाध्यमातून पसरवले गेले असेही म्हणतात. विशेषतः विशिष्ट विचारांचे, संघटनेचे लोक यात अधिक सक्रिय होते. तेच लोक मराठा मोर्चात तसे इतर घटकांच्या मोर्चात ही अधिक सक्रिय झाले. प्रसारमाध्यमातील चर्चेसाठी हेतूतः दोन्ही बाजूंच्या अशाच

ISSN : 2348-7143
February 2018

उठावळ लोकांना आंमत्रित केले जावू लागले. त्यातून जातीय अस्मितेचे टोकदार वाण चालवले जावू लागले, आम्ही किती ग्रेट आहोत वैगरे यासाठी ऐतिहासिक दाखले दिले घेतले जावू लागले. प्रत्येकाला औकात दाखविण्याची भाषा सुरु झाली. आणि पाहता पाहता मोर्चांचे रंग पालटले.

शांतपणे, संयमाने, शिस्तीचा आदर्श घालवून देत लाखोंचा जनसुमदाय रस्त्यांवर येतो आणि ज्यात शेतकरी, शेतमजुर, तरुण-तरुणींची संख्या अधिक होती. कधी शेतातले काम सोडून लग्न, कौटुंबिक कार्यक्रम वगळता बाहेर न पडलेली गरीब, कष्टकरी मराठा समाजातील महिला, मुली तशीच कायमच उंबर्याच्या आत प्रतिष्ठेच्या ओझ्याखाली दवलेली उच्चभ्रू मराठा समाजाच्या महिला, सुशिक्षीत तरुणी, शाळकरी मुली यांची संख्या यात अधिक होती. कधी नव्हे ते यासर्वांच्या मागे सर्वच राजकीय पक्षाचे नेते; हे सर्व मूकपणे बाहेर येतात, शांततेत शिस्तीत जिल्हाधिकारी, तहसील कार्यालयापर्यंत चालत जातात. छोट्याश्या मुली आपले निवेदन वाचून दाखवात. ना कोणाच्या विरोधात वोलत, ना कोणती घोषणा देत, ना सरकारचा निषेध करीत. या अशा विधायक, वाखणण्याजोग्या कृतीचा, शिस्तीचा विरोध कसा करायचा, मुकावला कसा करायचा या विषयी सत्ताधारी पातळीवर प्रचंड संभ्रम पाहायला मिळाला. त्यांनी 'गरीव मराठ्यांचा हा प्रस्थापित मराठ्यांच्या विरोधातील संघर्ष' आहे असे ठरविण्याचा प्रयत्न केला. परंतु याने फुट पडली नाही मग नेहमी प्रमाणे पडद्यामागील चाणक्यांनी आपली भूमिका वठवली व विविध समाजघटक आपसात लढविण्याची इंग्रजी खेळी पुन्हा यशस्वीपणे खेळली सुद्धा. त्यामुळेच मोर्चे, प्रती मोर्चे काढणार्यांच्या हाती काय पडले तर भले मोठे शून्य...! मग इथे तर हे थांवयला हवे होते. पण मोर्चांचे हे 'कवित्व'संपायला तयार नव्हते. कारण महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या, नगरपरिषदा, महानगरपलिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला जे यश मिळाले त्यानंतर 'गेला मोर्चा कुणी कडे..? असा प्रश्न माध्यमांसह अनेक विश्लेषकांनी उपस्थित केला. व त्यातून द्यायचा तो संदेश दिलाच. हा रोख प्रामुख्याने 'मराठा मोर्चा'च्या अनुषंगाने होता. मराठा समाजाने मतपेटी द्वारे आपली प्रतिक्रिया विद्यमान सरकार विरोधात का नोंदवली नाही. असा तो साधारण रोख होता. परंतु मराठा ही 'मतपेटी' कधीच नव्हती, नसेल हे माहीत असतानाही हा डंख मारण्याचा प्रयत्न होता. तो ती जातीयतेची धग कायम ठेवण्यासाठीच.

दुसरीकडे मात्र हाच प्रश्न मुस्लिम, दलित, ओवीसी मोर्चांच्या अनुषंगाने उपस्थित केला जात नाही कारण सामान्यतः या पंडीतांनी असे गृहीत धरले असावे की हे घटक नव्या व्यवस्थेत 'सवका साथ सवका विकास' या घोषणेच्या उवेने प्रतिगामित्वाचा शिक्का असणार्या पक्षाच्या छत्र छायेखाली आता स्वतःला सुरक्षीत समजत असावेत. त्याचप्रमाणे यातील कोणत्याही तथाकथित समाजघटकांच्या तकलादु पुरोगामीत्वाची चर्चा झाल्याचे ही दिसले नाही. म्हणजे एकूण मराठा मोर्चाच्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित झाले ते इतर मोर्चाच्या बाबतीत कोणी विचारले नाही. का तर म्हणजे कसं खालच्या स्तरात अमुक एका जातीत जन्माला आलात तर तुम्ही प्रचंड पुरोगामी, तुम्ही ब्राम्हण असाल तर प्रतिगामीच आणि मराठा असाल तर

ISSN : 2348-7143
February 2018

सरंजामी ही सामाजिक चौकट आपल्या व्यवस्थेत तयार आहे व तेच विश्लेषण, अर्थ, अन्वयार्थ लावणारी आजच्या पांढरपेशी विचारवंताच्या डोक्यात आहे. त्यामुळे हे घडते.

खरं तर 'मराठा क्रांती मूक मोर्चा' ही ऐतिहासिक घटना होती. हा 'जातीचा नाही तर मातीचा'प्रश्न आहे असे डाॅ. संदानंद मोरे यांच्या दृष्टितून प्रगल्भपणे पाहण्याचे औदार्य मराठा संघटनांचे काही उथळ कार्यकर्ते, मराठेत्तर काही जातीच्या संघटनांचे उथळ कार्यकर्ते व माध्यमांतील स्वयंघोषित तत्वज्ञ,विचारवंत यांनी दाखवले असते तर शेतीच्या संबधीत मागण्यांचा नीटपणे,साकाल्याने विचार करण्याचा 'दबाव' सरकारवर निर्माण झाला असता. स्वामीनाथन आयोग लागू करणे,हमीभाव यासारखे शेतीमातीचे प्रश्न सुटण्यास मदत झाली असती. व तेंव्हा हा मोर्चा 'संख्येचा दहशतवाद' ठरला नसता..तर जागतिकीरणाच्या वावटळीत,अस्मानी सुलतानीने कणा मोडून पडलेल्या प्रत्येक वांधावरच्या माणसाला आपल्याला जीवनात उभा करण्यासाठी 'वळ'देणारा लढा होता. असेच वाटले असते परंतु आम्ही ही वर्तमानातील ऐतिहासिक संधी गमावली तेंव्हा येणारा काळ आम्हाला माफ करणार नाही हे निश्चित......!